वर्ष- ११ | अंक- ४३ | मुंबई, मंगळवार, ०९ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027
PG|2

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

या एका गोष्टीने केस गळतीवर उपचार करा

3 → सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता येणार
लालबागचा राजा मंडळाला अन्नछत्रासाठी परवानगी नाकारली ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

प्राध्यापकांची प्रेरणादायी धाव : वाडा ते उज्जैन प्रवास यशस्वी









प्रा. विश्वास कांबेरे यांचा संदेश

'शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून, समाजाला दिशा देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे हेच शिक्षकाचे खरे कार्य आहे.' असे प्रा. कांबेरे यांनी सांगितले.

मार्ग व अंतर

- पहिला टप्पाः वाडा ते कसारा - १२६ किमी
- दुसरा टप्पाः कसारा ते नाशिक - ५० किमी
- तिसरा टप्पाः नाशिक ते माळेगाव - ५५ किमी
- चौथा टप्पाः माळेगाव ते धुळे - ९० किमी
- पाचवा टप्पाः धुळे ते शिरपूर - ९६ किमी
- सहावा टप्पाः शिरपूर ते सेंधवा - १९ किमी
- सातवा टप्पाः सेंधवा ते धारनोड - १० किमी
- आठवा टप्पाः धारनोड ते मंगळोदा - १०७ किमी
- नववा टप्पाः मंगळोदा ते उज्जैन - ४६ किमी

एकूण प्रवास - ६०० किमी

विशेषता

- या प्रवासात त्यांनी वाडा-तित्तसे, वाडा-एकविरा माता मंदिर (१४८ किमी) यासारखी अंतरं यापूर्वी विक्रमी पद्धतीने पार केली होती.
- तसेच वाडा-शिर्डी २२० किमी अंतर देखील अवघ्या दोन दिवसांत पूर्ण करून दाखवले होते.
- सलग धावण्यात त्यांचा हा प्रवास आजवरचा सर्वात मोठा विक्रम ठरला आहे.

वाडा।

वाड्यातील सुप्रसिद्ध प्राध्यापक विश्वास परशुराम कंबेरेयांनी स्वामी विवेकानंद महाविद्यालय, वाडा येथून ३० ऑगस्ट रोजी सुरुवात केलेली वाडा ते उज्जैन अशी तब्बल ६०० किमी अंतराची धाव अवघ्या आठ दिवसांत पूर्ण केली आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

उद्दिष्ट

प्रा. यांनी सांगितले की, शिक्षक दिनाच्या निमित्ताने 'प्रत्येक शिक्षक हा समाजासाठी प्रेरणास्त्रोत असतो' हा संदेश देण्यासाठी आणि शिक्षकांचा गौरव करण्यासाठी ही धाव आयोजित करण्यात आली होती.

मान्यवरांचा गौरव

प्रवासादरम्यान अनेक मान्यवर, स्थानिक नागरिक तसेच विविध सामाजिक संघटनांनी त्यांचे भव्य स्वागत व सत्कार केले. शालेय विद्यार्थी, शिक्षक व सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या या कायार्चे भरभरून कौतुक केले.

विद्यार्थ्यांचा सहभाग

या प्रवासाची प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी म्हणून शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी सतत सोशल मीडियाद्वारे त्यांच्याशी जोडलेले होते. काही विद्यार्थ्यांनी तर प्रत्यक्ष धावूनही त्यांना साथ दिली.

अशा प्रकारे वाड्यातील प्राध्यापक विश्वास कांबेरे यांची वाडा ते उज्जैन ६०० किमी प्रेरणादायी धाव यशस्वी झाली असून, समाजात आणि विशेषतः तरुणांमध्ये धैर्य, जिद्द आणि प्रेरणा निर्माण करणारा हा उपक्रम ठरला आहे.

लोकलसाठी क्यूआर तिकीट बंद ! रेल्वेचा नवा नियम



मुंबई, मुंबई उपनगरीय रेल्वेमधील प्रवाशांसाठी मध्य आणि पश्चिम रेल्वे प्रशासनाने क्यूआर कोडद्वारे मोबाईल तिकीट बुकिंग सेवा बंद केली आहे. फसवणूक रोखण्यासाठी हा निर्णय घेतल्याची माहिती आहे. त्यामुळे यापुढे जिओफेन्सिंग क्षेत्रात क्यूआर स्कॅन करून तिकीट बुक करता येणार नाही. रेल्वेचे पश्चिम विभागाचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनित अभिषेक यांनी सांगितले की,२०२३ पासून क्यूआर कोडचा गैरवापर वाढल्याचे निदर्शनास आले होते. काही प्रवाशांनी सर्व स्थानकावरील क्यूआर कोड डाऊनलोड करून ठेवले होते आणि ट्रेनमध्ये बसल्यानंतरच तिकीट बूक करत होते. यामुळे टीसीला फसवता येत होते. युटीएस ऑन मोबाईल ॲपवरून क्यूआर कोड स्कॅन करून तिकीट काढण्याची सुविधा आता पूर्णतः थांबवली आहे. नवीन नियमांनुसार, प्रवाशांना फक्त पेपरलेस जीपीएस आधारित तिकीट किंवा स्थानकावरून हार्ड कॉपी स्वरूपातील तिकीट काढता येईल. तिकीट बुकिंग फक्त तेव्हाच शक्य असेल जेव्हा प्रवासी स्थानकापासून किमान २० मीटर दूर असेल.मध्य आणि पश्चिम रेल्वेने समाज माध्यमावरूनही प्रवाशांना या बदलाची माहिती दिली.

मुंबईच्या पाणीपुरवठ्यासाठी दोन नवीन धरणांचा प्रस्ताव

मुंबई,मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला लागर्णाया पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आता दोन नवीन धरणे बांधण्याचा मुंबई महापालिकेचा प्रस्ताव आहे.पालघर जिल्ह्यातील पिंजाळ आणि गारगाई नद्यांवर ही दोन धरणे बांधण्याची योजना आहे. पुढील १६ वर्षापर्यंत म्हणजे २०४१ पर्यंत मुंबईकरांना दररोज ६५३५ दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता भासणार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळेच पालिकेने आता नवीन दोन धरणांचा प्रस्ताव तयार केला आहे. २०१४ मध्ये बांधलेल्या मध्य वैतरणा धरणानंतर पालिका बांधत असलेली ही पहिलीच दोन धरणे असतील.पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील खिडसे परिसरात पिंजाळ नदीवर एक धरण बांधले जाणार आहे. तर दुसरे धरण पालघर जिल्ह्यातीलच वाडा तालुक्यातील ओगदे गावाजवळ गारगाई नदीवर असणार आहे. गारगाईचे पाणी तेथून भूमिगत बोगद्याद्वारे मोडकसागर तलावात आणले जाईल. सध्या मुंबई महापालिका रोज ४ हजार एमएलडी पाणी मुंबईकरांना पुरवत असून त्यामधे साधारण ५०० एमएलडी पाण्याची टंचाई भासत असते. भविष्यात ही तूट ५० टक्क्यांनी वाढेल,असा अंदाज आहे.

गणेश विसर्जनावर दुःखाचे सावट! दहा ठार! बुडून, शॉक लागून मृत्यू

मुंबई- अनंत चतुर्दशीच्या दिवशी राज्यभर गणेश विसर्जन मोठ्या उत्साहात पार पडत असतानाच काही दुर्घटनांमुळे या उत्साहाला दुःखाची किनार आली. मुंबई, अमरावती, चाकण, चंद्रपूर, नांदेड, जळगाव, नाशिक,अकोला, भाईंदर, विरार येथे घडलेल्या दुर्घटनांत 9 जणांचा मृत्यू झाला. यातील काहींचा बुडून, तर काहींचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. काही अपघातात दगावले आहेत. अनेक जण जखमी झाले असून काहींची प्रकृती गंभीर आहे.

मुंबईतील प्रसिद्ध लालबाग राजा गणेशोत्सव मंडळाच्या प्रवेशद्वारासमोर विसर्जन मिरवणूक निघण्यापूर्वी भीषण अपघात झाला. भरधाव वाहनाने दोन चिमुकल्यांना चिरडले. आज पहाटे 3 ते 4 वाजण्याच्या सुमारास अज्ञात वाहनचालकाने रस्त्याच्या कडेला झोपलेल्या मुलांच्या अंगावरून आपले वाहन नेले. या भीषण अपघातात दोन्ही चिमुकली मुले चिरडली गेली. त्यात 2 वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू झाला तर तिचा 11 वर्षांचा भाऊ गंभीर जखमी झाला. या अपघातातील मृत बालिकेचे नाव चंद्रा वजणदार (2) असे आहे. तर तिच्या गंभीर जखमी झालेल्या भावाचे नाव शैलू वजणदार (11) असे आहे. त्याला तातडीने परळ येथील केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी काळाचौकी पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस फरार वाहनचालकाचा शोध घेत आहेत. ते परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत आहेत. मुंबईतील साकीनाका येथील खैराणी रोड परिसरात विसर्जन मिरवणुकीदरम्यान उच्चदाबाच्या तारेचा धक्का लागून बिनू शिवकुमार (36) हा तरुण दगावला. तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. यामध्ये दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. श्री गजानन मित्र मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीदरम्यान ही घटना घडली. खासगी कंपनीच्या 11 हजार व्होल्टेजचा वीजप्रवाह वाहून नेणाऱ्या तारेचा गणपतीच्या ट्रॉलीला स्पर्श झाला. त्यामुळे पाच जणांना शॉक लागला. त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, शिवकुमार याचा मृत्यू झाला, तर तुषार गुप्ता (18), धर्मराज गुप्ता (44), आरुष गुप्ता (12), शंभू कामी (20) आणि करण कनोजिया (14) हे पाच जण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मुंबईजवळील भाईंदर पश्चिम येथील मोदी पटेल मार्गावर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मिरवणुकीत विजेचा धक्का लागून मंडळाच्या कार्यकर्ता मृत्युमुखी पडला. प्रतिक शहा (34) असे त्याचे नाव होते. त्याला वाचवण्यासाठी गेलेला दुसरा कार्यकर्ता वेळेवर मदत मिळाल्याने वाचला. मोदी पटेल सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे यंदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असून, मंडळाने मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा केला होता. मंडळाने रस्त्यांवर व झाडांवर विद्युत रोषणाई केली होती. यासाठी विजेच्या तारा झाडांच्या फांद्यांवर बांधून तोरणमाळा टाकण्यात आल्या होत्या. काल रात्री साडेसात वाजताच्या सुमारास विसर्जन मिरवणूक निघाली असता प्रतिक शहाचा हात झाडावर टांगलेल्या विजेच्या तारेला लागला. त्यानंतर विजेचा धक्का बसून तो तिथेच चिकटला. त्याला वाचवण्यासाठी दुसरा कार्यकर्ता पुढे आला असता त्यालाही शॉक लागला. मात्र प्रसंगावधान राखून उपस्थितांनी बांबूच्या मदतीने त्याला बाजूला केले. मात्र, प्रतिक शहाचा



घटनास्थळीच मृत्यू झाला.

विरारमधील तीन भाविक नशीबवान ठरले. मारंबळपाडा जेट्टीवर एकाच कुटुंबातील हे सदस्य आपल्या घरातील गणपतीचे विसर्जन करण्यासाठी समुद्रात उतरले होते. त्यात एका महिलेचाही समावेश होता. विसर्जन करण्यासाठी ते खोल पाण्यात गेले. मात्र समुद्राची खोली आणि पाण्याचा वेग याचा अंदाज न आल्याने तिघेही वाहून जाऊ लागले. याची माहिती मिळताच सुवर्णदुर्ग रो-रो सेवेचे कर्मचारी फेरीबोट घेऊन तत्काळ तिथे पोहोचले. स्थानिक मच्छिमारांनीही आपल्या बोटींच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. त्यानंतर मच्छीमारांच्या छोट्या बोटीने त्यांना सुरक्षित बाहेर काढले.

गणेश विसर्जनावेळी अमरावती जिल्ह्यात घडलेल्या तीन वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये तिघांचा बुडून मृत्यू झाला. धामणगाव रेल्वे तालुक्यातील वाघोली येथे करण चव्हाण (22) हा तरुण विसर्जनासाठी नदीकाठी गेला असता पाय घसरून पाण्यात पडला. जोरदार प्रवाहात वाहून गेल्याने त्याचा मृत्यू झाला. मेळघाटातील धूळघाट रोडवरील गडगा येथे अनिल माकोडे या तरुणाचा नदीपात्रात पडून मृत्यू झाला, तर दयापूर शहरातील चंद्रभागा नदीपात्रात विसर्जनासाठी गेलेल्या मुक्ता श्रीनाथ (32) या तरुणीचाही पाण्यात पडून मृत्यू झाला. पुणे जिल्ह्यातील चाकण परिसरात घडलेल्या वेगवेगळ्या घटनांमध्ये चारजण बुडाले. त्यातील दोघांचा मृतदेह सापडला. तर दोघांचा शोध सुरू आहे. वाकी बुद्रुक येथील भामा नदीत विसर्जनासाठी गेलेले अभिषेक संजय भाकरे (21) आणि आनंद जयस्वाल (28) हे दोघे पाण्यात बुडाले. त्यापैकी आनंद जयस्वाल याचा मृतदेह मिळाला असून अभिषेक भाकरे याचा शोध पोलीस, एनडीआरएफ, अग्निशमन दल घेत आहे. शेलपिंपळगाव येथे भामा नदीतच रवींद्र वासुदेव चौधरी (45) हे वाहून गेले असून त्यांचा शोध सुरू आहे. तर बिरदवडी येथे विसर्जन करताना तोल गेल्याने संदेश पोपट निकम (35) हे विहिरीत पडले. त्यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. चंद्रपूर शहराजवळच्या इराई नदीवर दीक्षांत मोडक (18) या तरुणाचा नदीत बुडून मृत्यू झाला. ही घटना भटाडी पुलाजवळ घडली. तो गणपती विसर्जनासाठी गेला असताना अचानक पाण्यात पडला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली.

नांदेड जिल्ह्यातील गाडेगाव परिसरात आसना नदीत विसर्जनावेळी पाय घसरल्याने तीन तरुण पाण्यात पडले. यापैकी शैलेश इरबाजी उबाळे याला घाटावर उपस्थितांनी सुखरूप बाहेर काढले. मात्र, बालाजी कैलास उबाळे (18) आणि योगेश गोविंद उबाळे (17) हे दोघे नदीच्या जोरदार प्रवाहात वाहून गेले. या दोघांचा शोध एसडीआरएफ पथक आणि ग्रामीण पोलीस घेत आहेत. जळगावातील निमखेडी शिवारात घरगुती गणपती विसर्जनावेळी 25 वर्षीय गणेश गंगाधर कोळी हा तरुण आई-वडिलांच्या डोळ्यादेखत गिरणा नदीपात्रात वाहून गेला. निमखेडी शिवारातील नवीन बायपासलगत ही घटना घडली. ममुराबाद येथील कोळी कुटुंब घरगुती गणपतीचे विसर्जन करण्यासाठी गिरणा नदीपात्रावर गेले होते. यावेळी गणेश कोळी मूर्ती घेऊन नदीत उतरला, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने तो खोल पाण्यात वाहून गेला.

अकोल्यात गणेश विसर्जन पार पाडून परतणाऱ्या भाविकांवर मृत्यूने घाला घातला. पातूर-अकोला रोडवर कापशी तलावाजवळ दुचाकी आणि चारचाकी यांची जोरदार धडक होऊन चरण अंधारे यांचा जागीच मृत्यू झाला. तर राहुल खोंड, विनोद डांगे आणि विक्की माळी हे गंभीर जखमी झाले. या अपघातात दुचाकीचा चुराडा झाला. कारचेही मोठे नुकसान झाले. अपघातानंतर परिसरात मोठी गर्दी जमली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जखमींना तात्काळ शासकीय रुग्णालयात हलवले. यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



या एका गोष्टीने केस गळतीवर उपचार करा

केसांच्या अनेक समस्यांवर फिटकरी हा एक नैसर्गिक उपाय म्हणून ओळखला जातो. हा एक पांढरा स्फटिकासारखा पदार्थ आहे जो प्राचीन काळापासून त्वचा आणि केसांच्या काळजीसाठी वापरला जात आहे. केस गळतीच्या समस्येवर मात करण्यासाठी तुरटीचा वापर फायदेशीर ठरू शकतो. तुरटीमध्ये अँटीसेप्टिक, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे टाळू स्वच्छ आणि निरोगी ठेवतात, केसांच्या वाढीस चालना देतात आणि केस गळती नियंत्रित करण्यास मदत करतात. या लेखात, आपण केस गळती रोखण्यासाठी फिटकरीचा योग्य वापर कसा करता येईल ते जाणून घ्या .

१. तुरटी आणि नारळ तेल

केस गळतीची समस्या कमी करण्यासाठी तुरटी आणि खोबरेल तेलाचे मिश्रण उपयुक्त ठरू शकते. नारळाचे तेल केसांची मुळे मजबूत करते आणि तुरटी टाळू स्वच्छ करते, ज्यामुळे केस गळणे कमी होऊ शकते.

कसे वापरायचे:

तुरटीचा एक छोटा तुकडा घ्या आणि त्याची पावडर बनवा.

ही पावडर कोमट खोबरेल तेलात मिसळा.

हे मिश्रण केसांच्या मुळांवर आणि टाळूवर लावा.

हलक्या हातांनी १०-१५ मिनिटे मसाज करा आणि नंतर १ तासानंतर सौम्य शाम्पूने केस धुवा.

आठवड्यातून १-२ वेळा हे पुन्हा करा.

२. तुरटी आणि पाण्याने टाळू स्वच्छ धुवा

केस स्वच्छ करण्यासाठी फिटकरीचे पाणी प्रभावी आहे. हे टाळूवरील अतिरिक्त तेल आणि घाण काढून टाकते आणि केसांची मुळे म जबूत करते. यामुळे केस गळती नियंत्रित होते आणि केस निरोगी राहतात.



कसे वापरायचे:

एक लिटर पाणी उकळवा आणि त्यात तुरटीचा एक छोटा तुकडा घाला.

ते थंड होऊ द्या आणि केस धुतल्यानंतर हे पाणी टाळूवर ओता.

ते काही मिनिटे डोक्यावर राहू द्या आणि नंतर स्वच्छ पाण्याने धुवा.

आठवड्यातून एकदा हा उपाय केल्याने केस गळतीची समस्या कमी होऊ शकते.

३. फिटकरी आणि कोरफडीचे जेल



कोरफड केसांना म ॉइश्चरायझ करते आणि त्यात चमक आणते. तुरटी आणि कोरफडीचे मिश्रण टाळू स्वच्छ करते आणि केसांना मजबूत करते. हे मिश्रण केसांच्या मुळांमध्ये ओलावा टिकवून ठेवते, ज्यामुळे केस गळणे कमी होते.

कसे वापरायचे:

एक चमचा तुरटी पावडर आणि दोन चमचे कोरफडीचे जेल घ्या.

ते चांगले मिसळा आणि टाळूवर लावा.

ते १५-२० मिनिटे टाळूवर राहू द्या आणि नंतर सौम्य शाम्पूने केस धुवा.

हे मिश्रण आठवड्यातून एकदा वापरता येते.

चारकोल फेसमास्कचे फायदे जाणून घ्या



सध्या चारकोल फेस मास्क खूप लोकप्रिय झाले आहेत, विशेषतः ज्या महिला त्यांची त्वचा खोलवर स्वच्छ करू इच्छितात त्यांच्यामध्ये. कोळशाच्या नैसर्गिक गुणधर्मांमुळे, ते त्वचेतील घाण, अतिरिक्त तेल आणि मृत पेशी काढून टाकण्यासाठी खूप प्रभावी आहे. बाजारात अनेक चारकोल फेस मास्क उपलब्ध आहेत, परंतु ते घरी बनवून तुम्ही नैसर्गिक घटक वापरू शकता, जे त्वचेला हानी पोहोचवणाऱ्या रसायनांपासून मुक्त असतात. घरी चारकोलचा फेस मास्क कसा तयार करता येईल आणि त्याचे फायदे काय आहेत ते जाणून घेऊया.

चारकोल फेस मास्कचे फायदे

१. खोल साफसफाई

चारकोल मध्ये अशुद्धता बाहेर काढण्याची शक्ती असते, ज्यामुळे ते त्वचेला खोलवर स्वच्छ करते. हे छिद्रे उघडते आणि चेहऱ्यावरील सर्व घाण काढून टाकते.

२. जास्त तेल कमी करते

तेलकट त्वचा असलेल्यांसाठी चारकोल चा फेस मास्क वरदान ठरतो. हे त्वचेतील अतिरिक्त तेल संतुलित करण्यास मदत करते, ज्यामुळे चेहरा ताजा आणि कमी तेलकट वाटतो.

३. मुरुमे कमी करते

चारकोलच्या अँटी-बॅक्टेरियल गुणधर्मामुळे मुरुमे आणि मुरुमे कमी होण्यास मदत होते. हे चेहऱ्यावरील बॅक्टेरिया काढून टाकते, ज्यामुळे मुरुमे कमी होतात.

४. रंग उजळवते

नियमित वापराने, चारकोलचा फेस मास्क त्वचेचा रंग एकसारखा करतो आणि ती चमकवतो. हे मृत त्वचेच्या पेशी काढून टाकते आणि एक चमकदार आणि स्वच्छ पोत देते.

घरी चारकोलचा फेस मास्क कसा बनवायचा?

चारकोल फेस मास्क तयार करण्यासाठी मुख्य घटक म्हणजे सक्रिय चारकोल पावडर. याशिवाय, त्यात इतर नैसर्गिक घटक घालून त्याचे फायदे वाढवता येतात. घरी कोळशाचा फेस मास्क तयार करण्याचे काही सोपे मार्ग येथे आहेत:

चारकोल फेस मास्कसाठी आवश्यक साहित्य:

१ चमचा सक्रिय चारकोल पावडर (औषधांच्या दुकानात किंवा ऑनलाइन उपलब्ध)

१ चमचा बेंटोनाइट क्ले किंवा मुलतानी माती (जास्त घाण काढण्यासाठी)

१ चमचा कोरफड जेल (त्वचेला आराम देण्यासाठी)

२-३ थेंब चहाच्या झाडाचे तेल किंवा लैव्हेंडर तेल (बॅक्टेरियाविरोधी गुणधर्मांसाठी)

पाणी किंवा गुलाबजल (पेस्ट बनवण्यासाठी)

चारकोलचा फेस मास्क कसा बनवायचा:

एका भांड्यात सक्रिय चारकोल पावडर आणि मुलतानी माती (किंवा बेंटोनाइट माती) घाला.

त्यात काही थेंब कोरफडीचे जेल आणि चहाच्या झाडाचे तेल घाला.

आता हळूहळू गुलाबपाणी किंवा पाणी घालून जाडसर पेस्ट बनवा.

पेस्ट नीट मिसळा जेणेकरून गुठळ्या राहणार नाहीत आणि ती गुळगुळीत होईल.

चारकोलचा फेस मास्क कसा वापरायचा?

प्रथम, तुमच्या त्वचेवरील तेल आणि घाण काढून टाकण्यासाठी तुमचा चेहरा धुवा.

आता तयार केलेलीचारकोलची पेस्ट चेहऱ्यावर पातळ आणि समान थरात लावा. ते डोळ्यांभोवती आणि ओठांभोवती लावू नका याची काळजी घ्या.

मास्क १०-१५ मिनिटे सुकू द्या.

मास्क सुकल्यानंतर, कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ करा आणि तो पूर्णपणे पुसून टाका.

यानंतर चेहऱ्यावर मॉइश्चरायझर लावा जेणेकरून त्वचा ओलसर राहील.

शिफॉन साडी मध्ये सुंदर दिसण्यासाठी टिप्स



शिफॉन साडीचे सौंदर्य कोणत्याही महिलेचे लूक वाढवू शकते. या साड्या त्यांच्या सौंदर्यासाठी, नाजूक कापडासाठी आणि आकर्षक ड्रेसिंगसाठी ओळखल्या जातात. कोणत्याही लग्न, सण किंवा ऑफिसच्या कार्यक्रमासाठी शिफॉन साडी तुमचा लूक आणखी वाढवू शकते. तथापि, शिफॉन साडीची काळजी घेणे तुमच्यासाठी थोडे अवघड असू शकते. जर तुम्ही अजून शिफॉन साडीसोबत हा लूक ट्राय केला नसेल, तर या टिप्स फॉलो करा -

१. शिफॉन साडीचा रंग

साडी शिफॉनची असो किंवा इतर कोणत्याही कापडाची, तुम्हाला अनुकूल असलेला रंग निवडा. जर तुमचा त्वचेचा रंग गडद असेल तर गडद रंग तुमच्यावर छान दिसतील आणि जर तुम्ही गडद रंगाचे असाल तर तुम्ही चमकदार आणि हलक्या रंगाच्या शिफॉन साड्या निवडू शकता.

२. ब्लाउज डिझाइन

शिफॉन साडीसोबत, तुम्ही ब्रोकेड किंवा सिल्क फॅब्रिकपासून बनवलेला डिझायनर ब्लाउज देखील घालू शकता. स्लीव्हलेस व्यतिरिक्त, तुम्ही शिफॉन साडीसोबत ब्रेलेट ब्लाउज देखील कॅरी करू शकता.

३. पल्लूला असे गुंडाळा.

तुम्ही शिफॉन साडीचा पल्लू ओपन फॉल स्टाईलमध्ये कॅरी करू शकता. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही साडीच्या पल्लूला मफलर स्टाईल देखील देऊ शकता. या प्रकारच्या पल्लू शैली कॅरी करायला खूप सोप्या आहेत.

४. कोणत्या प्रकारचे दागिने घालायचे

जर तुम्हाला या साडीत पार्टीवेअर लूक हवा असेल तर साडीसोबत डिझायनर डायमंड आणि रुबी मिक्स ज्वेलरी घालणे हा एक चांगला पर्याय असेल. शिफॉन साडीसोबत डिझायनर केप घालल्याने तुमचा लूक वेगळा दिसतो. यासोबतच, तुम्ही साडीसोबत डिझायनर बेल्ट घालून तिला ट्रेंडी लूक देऊ शकता.

त्वचेच्या अनेक समस्यांवर पनीरचे पाणी वापरा, जाणून घ्या वापरण्याची पद्धत

जर तुम्हाला तुमची त्वचा नैसर्गिकरित्या निरोगी ठेवायची असेल, तर तुम्हाला नैसर्गिक उत्पादने वापरण्याचा सल्ला दिला जातो. बरं, असे अनेक उपाय आपल्या स्वयंपाकघरात लपलेले आहेत ज्यांची आपल्याला माहितीही नसते.



अशीच एक गोष्ट म्हणजे पनीरचे पाणी, ज्यामध्ये पनीर ठेवले जाते. जेव्हा पनीरचा वापर केला जातो आणि पाण्याला आपण फेकून देतो. पण हे पाणी तुमच्या त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे, ज्याच्या म दतीने त्वचेची नैसर्गिक चमक पुन्हा आणली जाऊ शकते आणि त्वचेशी संबंधित आजार देखील बरे होऊ शकतात. या लेखात आम्ही तुम्हाला पनीरच्या पाण्याचे फायदे आणि त्याचा योग्य वापर कसा करावा याबद्दल सांगणार आहोत.

त्वचेसाठी पनीरच्या पाण्याचे फायदे काय आहेत?

१. नैसर्गिकरित्या चमक वाढवते

रासायनिक उत्पादने वारंवार वापरल्यामुळे जर तुमची त्वचा नैसर्गिक चमक गमावत असेल तर तुम्ही पनीरचे पाणी एकदाच वापरावे. त्वचेची नैसर्गिक चम क वाढवण्यासाठी फक्त नैसर्गिक गोष्टी वापरण्याचा सल्ला दिला जातो आणि पनीरचे पाणी ही त्यापैकी एक आहे.

२. वृद्धत्वाची लक्षणे नियंत्रित करा

आजची वाईट जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या बेफिकीरपणामुळे वृद्धत्वाची लक्षणे लवकर दिसू लागतात. पनीरच्या पाण्यात असलेले विशेष घटक वृद्धत्वाची लक्षणे टाळतात आणि त्वचा दीर्घकाळ तरुण ठेवण्यास मदत करतात.

३. त्वचेचा मुलायमपणा राखतो

जर तुमची त्वचा खूप कोरडी असेल तर त्वचेचा मुलायमपणा टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही पनीर पाण्याचा वापर करावा.

योग्य पद्धत आणि वापरण्याची वेळ

त्वचेशी संबंधित आजार दूर करण्यासाठी पनीरच्या पाण्याचा योग्य वापर करणे म हत्त्वाचे आहे. पनीरचे पाणी त्वचेसाठी जितके फायदेशीर आहे तितकेच ते वापरण्यासही सोपे आहे. ते लावण्यापूर्वी त्वचा स्वच्छ पाण्याने धुवा आणि सूती कापडाने हलकेच पुसून टाका. आता कापसाच्या तुकड्याच्या मदतीने पनीरचे पाणी त्वचेवर लावा.

पनीरच्या पाण्याचा वापर त्वचेवर केव्हाही केला जाऊ शकतो, परंतु सकाळी उठल्यानंतर लगेच किंवा संध्याकाळी झोपण्यापूर्वी ही सर्वोत्तम वेळ मानली जाते. जर तुम्ही ते रात्री वापरू शकत असाल तर तुम्ही ते तुमच्या त्वचेवर रात्रभर सोडू शकता किंवा २ तासांनंतर त्वचा स्वच्छ पाण्याने धुवा.



पायांची काळजी घेण्याच्या या टिप्स फॉलो करा

कधी टाचांना भेगा, कधी टॅन, कोरडी त्वचा, कधी घाण... सर्व वयोगटातील महिला पायांच्या या समस्यांनी त्रस्त आहेत. आपल्या शरीराच्या महत्वाच्या भागांपैकी एक म्हणजे आपले पाय. सर्वप्रथम लोक आपल्या पायांकडे पाहतात. अशा परिस्थितीत, त्यांचे सुंदर आणि सादरीकरण करणे खूप महत्वाचे आहे. या लेखात असे काही उपाय दिले आहेत, ज्यांच्या मदतीने तुम्ही तुमच्या पायांची काळजी घेऊ शकता.

१. मध : मधात उपचारात्मक गुणधर्म देखील आहेत. पहिला फायदा म्हणजे मध टाचांना मॉइश्चरायझ करते आणि त्यांना मऊ देखील करते. जर तुमच्या टाचांवर जखमा असतील तर मध ते लवकर बरे करते.

कसे वापरायचे : एका टबमध्ये कोमट पाणी घ्या आणि त्यात १ टेबलस्पून मध घाला. नंतर तुमच्या टाचांना या पाण्यात ८ ते १० मिनिटे बुडवा. नंतर, तुमचे पाय टॉवेल किंवा रुमालाने पुसून टाका. जर तुम्ही या पद्धतीने नियमितपणे तुमच्या टाचांची काळजी घेतली तर ही समस्या लवकर सुटेल.

२. रात्री झोपण्यापूर्वी मालिश करा : तुमचे पाय सुंदर आणि मऊ करण्यासाठी, रात्री झोपण्यापूर्वी तुमचे पाय चांगले धुवा आणि नंतर मॉइश्चरायझिंग क्रीम वापरून काही वेळ पायांची मालिश करा. असे केल्याने माणसाला चांगली झोप तर येतेच पण पायही चमकदार बनवता येतात.

३. प्युमिक स्टोन : बदलत्या हवामानामुळे पायांची त्वचा कधीकधी खडबडीत होते. त्वचेची हरवलेली चमक परत आणण्यासाठी, पायांच्या कडक त्वचेला प्युमिस स्टोनने घासून घ्या. प्युमिक स्टोन मृत त्वचा काढून त्वचेला एक्सफोलिएट करण्याचे काम करतो.

कसे वापरायचे : सर्वप्रथम, तुमचे पाय कोमट पाण्याच्या टबमध्ये बुडवा. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही पाण्यात थोडे बॉडी वॉश घालू शकता. ५ मिनिटांनंतर, गोलाकार हालचालीत प्युमिक स्टोनने पाय घासून घ्या. नंतर मृत त्वचा काढून टाकल्यानंतर पाय कोरडे करा. त्यानंतर कोणतीही क्रीम लावा आणि मोजे घाला जेणेकरून ते पायांसाठी अधिक प्रभावी ठरेल.

४. ग्लिसरीन : ग्लिसरीन त्वचेतील ओलावा अडकवण्याचे काम करते. हिवाळ्यात पाय मऊ, गुळगुळीत आणि भेगा न पडण्यासाठी ग्लिसरीन हा एक सोपा उपाय आहे.

कसे वापरायचे :

दोन झाकण गुलाब पाण्यात चार झाकण ग्लिसरीन मिसळा. हे मिश्रण तुमच्या पायांना चोळा. यानंतर, मोजे घाला आणि झोपा. रात्रभर ठेवल्यानंतर सकाळी कोमट पाण्याने धुवा.



पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार, ०९ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५

संपादकीय

सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता येणार



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



गुन्हेगारांची मानसिकता आणि त्यामागील मानसशास्त्रीय कारणे, गुन्हेगारी कृत्ये करणाऱ्या लोकांची मानसिकता एकाच साच्यात बसवता येत नाही. प्रत्येक व्यक्तीबाबतीत कारणे वेगवेगळी असू शकतात, पण काही सामान्य मानसिक कारणे आणि सामाजिक घटक यामागे कारणीभूत असतात. याबद्दल सविस्तर माहिती आपण या लेखातून घेणार आहोत. समाजात नेहमीच घडणाऱ्या चोरी, घरफोडी, दरोडा, लुटमार आणि कोणत्याही स्वरूपाची आर्थिक फसवणूक यांसारख्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सामान्य जनतेमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होते. जनतेचे मेहनतीने साठवलेले, बँक अकाउंटमध्ये असलेले, रिटायरमेन्टचे पैसे, दागदागिने, रोकड, पार्किंगमधील वाहने देखील चोरटे हातोहात लंपास करतात. शहरी तसेच ग्रामीण भागातसुद्धा जबरी लूट, दरोडा, घरफोडी, महिलांचे मंगळसूत्र खेचणे, खोटे कॉल सेन्टर, सायबरमार्फत आर्थिक फसवणूक, पैसे दाम दुप्पट करणे, सरकारी नौकरी लावण्याच्या बहाण्याने असे आमिष दाखवून सर्वसामान्य जनतेची फसवणूक सुरू आहे. अनेकदा जीवघेणा हल्ला करणे, अपहरण करणे त्यानंतर ब्लॅकमेल करणे यांसारख्या गंभीर घटना देखील घडताना आपण पाहतो. सुशिक्षित, पदवीधर व्यक्तीसुद्धा अशा गुन्ह्यात सहभागी असल्याचे दिसते. अशा गुन्हेगारांना आपण व्हाईट कॉलर क्रिमिनल म्हणू शकतो. अशा गुन्हेगारांचे उच्च राहणीमान, सर्व भाषा सफाईदारपणे बोलणे, त्यांच व्यक्तिमत्त्व, विषयाचं सादरीकरण इतकं प्रभावी असतं की कोणीही त्यांच्यावर संशय घेत नाही. अशा प्रकारचे गुन्हे करणारी व्यक्ती केवळ लोभी किंवा वाईट नसते, तर त्यांच्या या कृतींमागे अनेक जटिल मानसशास्त्रीय कारणे दडलेली असतात. या कारणांना समजून घेणे आणि त्यावर योग्य उपाययोजना करणे हे समाजाच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेकदा चोरी, घरफोडी यांसारख्या गुन्ह्यांचे मूळ कारण दारिद्र्य आणि बेरोजगारी असते. जेव्हा एखादी व्यक्ती मूलभूत तसेच दैनंदिन जीवनासाठी आवश्यक गरजा पूर्ण करू शकत नाही, तेव्हा ती हताश होऊन चुकीच्या मार्गाचा अवलंब करते. समाजात आर्थिक आणि सामाजिक असमानता वाढत असताना, काही लोकांना असे वाटते की, त्यांच्यासाठी न्याय्य मार्ग उपलब्ध नाही आणि म्हणून ते गुन्हेगारीकडे वळतात. कितीही शिकले तरी नोकरी मिळत नाही, उद्योग व्यवसायाला भांडवल उपलब्ध नाही, कोणताही प्रयत्न यश देत नाही, आर्थिक साथ देणारे कोणी नाही अशा परिस्थितीत, सरळ मार्गाने पैसे कमवणे खूप अवघड आहे किंवा खूप वेळखाऊ आहे हे लक्षात आल्यावर अनेकजण गुन्हेगारीकडे वळतात. समाजात प्रामाणिकपणाला, मेहनतीला काही किंमत नाही, खरं वागून, खरं बोलून आपली कधीच प्रगती होऊ शकत नाही असा ग्रह करून वाम मार्गाकडे सुशिक्षित लोक सुद्धा वळतात. आपल्या सरळ मार्गाने कमवलेल्या पैशात आपल्या गरजा, जबाबदाऱ्या, अपेक्षा पूर्ण होत नाही, सतत आर्थिक ओढाताण होते अशा परिस्थितीमध्ये चुकीची संगत, चुकीच्या लोकांचे सल्ले मिळाले तरी अगदी चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे लोक चुकीच्या मार्गाने पैसे कमावू लागतात. असे करत असताना त्यांना घरातून, समाजातून चांगले समजावून सांगणारे, शिकवणारे, योग्य मार्गदर्शन देणारे कोणीही न भेटल्यास हे लोक पटकन भरकटतात. हे सर्व होतानाच नैतिक मूल्यांचा अभाव अनेक लोकांमध्ये दिसून येतो. काही व्यक्तींमध्ये लहानपणापासूनच नैतिक मूल्यांची योग्य वाढ झालेली नसते. चुकीचे काय आणि बरोबर काय, याची त्यांना जाणीव नसते. कोणाला लुबाडणे हे चुकीचे वाटत नाही. अनेकदा, अशा लोकांना चुकीचे मार्गदर्शन मिळते किंवा ते चुकीच्या संगतीमुळे गुन्हेगारीकडे आकर्षित होताना त्यांना कोणीच आडवत नाही, कोणीच आळा घालत नाही. त्यांना तत्काळ मिळणाऱ्या फायद्यासाठी इतरांचे नुकसान करणे याची थोडीही पर्वा नसते. बालपणी भोगलेले दारिद्र्य, सतत मनाला मुरड घालावी लागलेली असणे, सरळ सोप्या मार्गाने अथवा खूप मेहनत, कष्ट करूनही अपेक्षित उत्पन्न, यश न मिळणे, घरातील व्यक्तींनी योग्य दिशा न दाखवता फक्त पैसे कमवून आिण यासाठी तगादा लावणे, आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त जबाबदाऱ्या अथवा खर्च ओढवून घेणे, लहानपणापासून चांगले संस्कार मिळालेले नसणे, कायम दुर्लक्षित राहिलेले असणं यामुळे अनेक चांगल्या घरातील व्यक्ती सुद्धा चोऱ्या, लबाडी, आर्थिक फसवणूक करणे असे मार्ग निवडतात. मानसिक विकृती हे देखील महत्त्वाचे कारण अशा गुन्ह्यात पाहायला मिळते. काही विशिष्ट मानसिक विकृतींमुळे देखील व्यक्ती गुन्हेगारीकडे वळू शकते. उदाहरणार्थ, काही लोकांमध्ये ह्यअँटी-सोशल पर्सनॅलिटी डिसऑर्डरह्ण आढळते. अशा व्यक्तींना दुसऱ्यांच्या भावनांची पर्वा नसते आणि ते नियमांचे उल्लंघन करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. त्यांना स्वतःच्या फायद्यासाठी इतरांचा वापर करण्यात काहीच गैर वाटत नाही. सामाजिक दबाव आणि प्रतिष्ठा हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. सुशिक्षित, सुसंस्कृत चांगल्या घरातील लोकं सुद्धा जेव्हा अशा मार्गाने पैसे उपलब्ध होण्यासाठी चुकीची कामं करतात. समाजात मिळणाऱ्या ह्यप्रतिष्ठेसाठीह्ण अनेक लोक गुन्हेगारीकडे वळतात. उदाहरणार्थ, टोळीमध्ये सामील होणे, धोकादायक कृत्ये करणे, समाजात लवकर श्रीमंत होण्याचा दबाव असतो आणि त्यातून फसवणूक, ऑनलाइन स्कॅम यांसारखे गुन्हे घडतात. अशा गुन्हेगारांना ह्यस्मार्टह्ण किंवा ह्यहुशारह्ण मानले जाते आणि समाजामध्ये त्यांना एक प्रकारची चुकीची प्रतिष्ठा मिळते. अशा प्रकारची गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यासाठी काय करता येईल? यावर चर्चा करणे आजकाल खूप निकडीचे आहे. सामाजिक दृष्टीने आर्थिक विकास करणे गरजेचे आहे. गरिबी आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने प्रभावी योजना राबवणे आवश्यक आहे. लोकांना रोजगार आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्यास, ते चुकीच्या मार्गाकडे वळणार नाहीत. तसेच, गरीब आणि वंचित लोकांसाठी योग्य पुनर्वसन कार्यक्रम सुरू करणे गरजेचे आहे. शिक्षण तसेच नैतिक शिक्षण खूप महत्त्वाचे आहे. शाळेतील अभ्यास क्रमांव्यतिरिक्त मुलांना लहानपणी मूल्य, तत्त्व, चांगलं वाईट शिकवण्यात आले पाहिजे. शाळांमध्ये नैतिक मूल्यांवर आधारित शिक्षण देण्यावर भर दिला पाहिजे. अनेकदा घरातील खूप गरिबीचे वातावरण, आहे त्यात समाधान मानन्याची वृत्ती नसणे, लोकांवर अधिकाधिक प्रभाव टाकण्याची जिद्द, आपण खूप वेगळे, मोठे कोणीतरी आहोत हा भ्रम टिकवण्याची मानसिकता, सुखी असण्यापेक्षा सुखी आहोत हे दाखवण्यासाठी केलेली धडपड व्यक्तीला चुकीच्या मार्गाने पैसे मिळवायची प्रेरणा देते. समुपदेशन थेरपी आणि उपचार उपलब्ध करून दिल्यास अशा लोकांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडवता येऊ शकतो. मानसिक आरोग्य तपासणी आणि उपचार सहज उपलब्ध करून दिल्यास, व्यसनाधीनता आणि इतर मानसिक समस्यांमुळे होणारे गुन्हे कमी होतील. समाजातील प्रत्येक व्यक्तीने फसवणुकीचे प्रकार, ऑनलाइन स्कॅम आणि इतर गुन्हेगारी कृत्यांविषयी जागरूक असणे महत्त्वाचे आहे. आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी डिजिटल साक्षरता वाढवणे आणि सुरक्षिततेचे नियम पाळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, नागरिकांनी संशयास्पद किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटनांबद्दल पोलिसांना त्वरित माहिती दिली पाहिजे. आपल्या आजूबाजूला कुठेही कोणीही असे चुकीचे कृत्य करते आहे अथवा करू शकते अशी जाणीव झाल्यास त्याला वेळेत आळा घातला गेला पाहिजे. या उपाययोजनांचा एकत्रित वापर केल्यास, समाजात सुरक्षितता वाढू शकते आणि गुन्हेगारी कृत्ये करण्यामागील मूळ कारणांवर नियंत्रण मिळवता येऊ शकते. गुन्हेगाराला केवळ शिक्षा देणे पुरेसे नाही, तर त्याच्या मानसिकतेचा अभ्यास करून त्यामागील कारणे दूर करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. कायद्याने झालेली शिक्षा गुन्हेगाराला तात्पुरते रोखण्यासाठी मदत करते; परंतु अनेक लोकांमध्ये शिक्षा भोगून पण गुन्हेगारी वृत्ती कायम राहते. अनेकदा शिक्षा भोगल्यावर गुन्हेगार जास्त पक्का होतो, निरड होतो आणि जास्त जोमाने परत त्या मार्गाकडे आगेकूच करतो त्यामुळे गुन्हेगारीचा समूळ नायनाट करण्यासाठी गुन्हेगारांचे समुपदेशन खूप मोलाची भूमिका बजावते.

अविश्वासाचा धोका कायम



विरारमध्ये धोकादायक इमारत कोसळून १७ जणांचा बळी गेल्यानंतर दरवर्षीप्रमाणे या पावसाळ्यातही पालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींचा प्रश्न पुढे आला आहे. मुंबईत घरांच्या किमती गगनाला भिडल्यानंतर सामान्य नोकरदारांनी ठाणे, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, टिटवाळा, बदलापुरात आश्रय घेणे सुरू केले. मुंबई आणि मुंबईलगतच्या या भागामध्ये आधी गावठाणं होती. त्यांना मोठा दर आल्याने शेतजमिनीही बिनशेतीच्या करण्यात आल्या आणि इमारती उभारणे सुरू झाले. हे काम मागील पाच दशकांपासून सुरू होतेच. मात्र मागील वीस वर्षात जागतिकीकरणानंतर त्याला कमालीचा वेग आला आणि ही शहरांची सूज वाढू लागली.मुंबई पर्यटन

कल्याण डोंबिवली, ठाण्यातील शहरबाह्य परिसर फुगत चालला आहे. उल्हासनगर, विरार नालासोपारा, भिवंडी, कळवा, दिवा या भागात मागील चार दशकांपासून बेकायदा इमारती वाढत आहेत. कळवा भागात याआधी रस्ते आणि इतर विकासकामांना अडथळा ठरणाया इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या, मात्र येथील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कायम आहे. ठाण्यातील महापालिका आणि नगरपालिका क्षेत्रात बेकायदा बांधकामे आणि धोकादायक इमारतींचा प्रश्न मागील चार दशकाआधीपासूनच गंभीर आहे.

पालिकेवर अनेकांच्या सत्ता आल्या आणि गेल्या, प्रशासकीय राजवटीही येऊन गेल्या. अधिकारी, आयुक्त, महापौर, अध्यक्ष अनेकदा बदलले, मात्र धोकादायक इमारतींचा प्रश्न कायम आहे. बेकायदा वास्तू आणि धोकादायक इमारतींचा प्रश्न या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या भागातही घरांच्या किमती वाढत असल्याने सामान्य कामगार कर्मचायांना नाईलाजाने धोकादायक किंवा अधिकृततेची पुरेशी शाश्वती नसलेल्या इमारतींमध्ये घर घ्यावे लागत आहे. या इमारती कालांतराने बेकायदा ठरवल्या जातात. धोकादायक इमारत का असेना कमी किमतीत घर मिळत असल्यास जीवावर उदार होऊन अशी घरे घेण्याकडे सामान्यांचा कल असतो. नगरपंचायतीच्या महापालिका झाल्यावरही धोकादायक इमारतींचा प्रश्न सुटलेला नाही. भिवंडी, उल्हासनगर, कळवा मुंब्रा, नालासोपारा आदी ठाण्याच्या अनेक भागात धोकादायक इमारतींचा प्रश्न खूपच गंभीर बाब होऊन बसला आहे. दरवर्षी पावसाळ्यात या इमारतींच्या प्रश्नांवर चर्चा होते. इमारती कोसळण्याच्या घटना घडल्यावर त्याच्या बातम्या होतात, प्रशासन, सरकारविरोधात संताप व्यक्त केला जातो, त्यानंतर परिस्थिती पुन्हा ह्यजैसे थेह्ण होते. क्लस्टर किंवा इतर योजनांमुळे आधीच विस्थापनाचा प्रश्न आहे. या शहरांच्या सुनियोजनाचे केव्हाच तीन तेरा वाजले आहेत. नगरविकास विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिक कमतरता आणि भ्रष्टाचाराने पोखरलेल्या आहेत. सरकारी यंत्रणा ढिम्म आहेत, अशा परिस्थितीत वस्तुस्थिती समजून ती बदलण्याची इच्छाशक्ती लोकप्रतिनिधी, नेते आणि कुठल्याही राजकीय पक्षांमध्ये नाही. उभीआडवी वाट्टेल तशी शहरे उभारली गेली आहेत. मेट्रो, क्लस्टरसारख्या योजनांनी गोंधळात भर घातली आहे. केवळ ठाणे महापालिका क्षेत्रातच ३८ धोकादायक इमारती आहेत. या इमारती रहिवाशांशी संवाद साधून तातडीने रिकाम्या करण्याचे निर्देश पालिका प्रशासनाने दिले आहेत. विरारमधील इमारत दुर्घटनेनंतर असे निर्देश देण्यात आले आहेत. अशीच किंबहुना याहीपेक्षा अधिक धोकादायक स्थिती भिवंडी, उल्हासनगर अशा महापालिका, नगर परिषद क्षेत्रात आहेत.

क्लस्टरसारख्या विकास योजनांतील विस्थापितांचा प्रश्न कायम आहे. रस्ते, मेट्रोसारख्या प्रकल्पातील विस्थापितही वाढत आहेत. याआधीच्या योजनेतील विस्तापितांची रवानगी ट्रान्झिस्ट कॅम्पमध्ये झालेली असताना आधीचे घर गेले, आता मिळालेले घरही जाते की काय, या भीतीने कॅम्पमधील घरेही सोडायला कित्येक ठिकाणी रहिवासी तयार नाहीत. धोकादायक इमारतीतील रहिवासी घरे रिकामी करतील, मात्र त्यांना त्यांची घरे पुन्हा उभारून त्याच ठिकाणी किंवा दुर्सया ठिकाणी पुनवर्सनाची शाश्वती नाही. याबाबत सरकार आणि यंत्रणांना सातत्याने अपयश आले आहे. धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीचा प्रश्न नेहमी इमारत कोसळण्याची दुर्घटना घडल्यावरच का चचेर्ला येतो, त्यासाठी काही बळी जावेच लागतात का? असाही प्रश्न आहे.

धोकादायक इमारतीमध्ये राहाणे हा रहिवाशांचा नाईलाज असल्याने आणि या नाईलाजावर ठोस असे आश्वासक विश्वासू उत्तर सरकारी यंत्रणांकडे नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे.

एकट्या ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण 93 अतिधोकादायक इमारती असून त्यापैकी 56 इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. उर्वरित 37 इमारतींमध्ये एकूण 191 कुटुंबे वास्तव्यास आहेत. महापालिका या इमारती रिकाम्या करून त्याचा ताबा कोणाकडेही देणार नाही. त्या इमारती रहिवाशांच्या ताब्यात राहतील, याविषयी रहिवाशांनी कोणतीही शंका मनात बाळगू नये, असेही ठामपा आयुक्त राव यांनी पुन्हा स्पष्ट केले आहे. रहिवाशांच्या मनात अशी शंका येण्यासाठी याआधीचे अनुभव कारणीभूत ठरले आहेत.

ठाण्यातील 80 हजार कुटुंबीयांचे अजूनही धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्य असल्याचे वृत्त आहे, जर असे असेल तर हा मोठा धोका आहे. एकदा राहते घर सोडले की हक्काचा निवारा गमावून बसण्याच्या भीतीपोटी रहिवाशी इमारती रिकाम्या करण्यास तयार नसतात. अशीच स्थिती ठाणे, पालघर जिल्ह्यातील महापालिका, पालिकाक्षेत्रातही थोड्याफार फरकाने आहे. सरकार, पालिका, लोकप्रतिनिधींकडून विकास योजनांच्या आश्वासनांचा उडालेला बोजवारा याला कारण आहे. हा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी विस्थापितांच्या पुनवर्सनाचा ठोस आणि मजबूत असा पर्याय धोकादायक इमारतीतील रहिवाशांना मिळायला हवा, तो जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही.

सगुण-निर्गुणः आनंदवनभुवनी

भविष्यात रामराज्य घडेल हा स्वप्नोपदिष्ट आशावाद वाटला, तरी तो सत्यात उतरेल याबद्दल समर्थांना संदेह नाही; कारण तत्कालीन स्वधर्मीयांना चेतवणारी विजिगीषा या कवितेत त्यांनी ओतप्रोत आणली आहे. भूत, वर्तमान आणि भविष्य यांना सांधणारी कविता कोणती, असं कोणी विचारलं तर निःसंदिग्धपणे जिचं नाव घेता यावं ती स्तोत्ररूपी कविता म्हणजे, समर्थांचं आनंदवनभुवनी ! या काव्याचा विचार काही कारणांनी अभ्यासकांना गूढ वाटत आलाय. आनंदवनभुवन म्हणजे महाराष्ट्र असावा, की काशीक्षेत्र असावं, इथूनच संभ्रमाला सुरुवात होते. दुसरीकडे, जन्मदुःखें जरादुःखें, नित्य दुःखे पुन्हा पुन्हा, संसार त्यागणे जाणे, आनंदवनभुवना अशी तिची करुण सुरुवात करणारे सहा श्लोक आणि वैराग्य जाहले सर्वे आनंदवनभुवनी असे तिचे सांगतेचे श्लोक वाचले, की या कवितेचा बाज वैराग्यपूर्ण असावा असा निर्णय होतो. पण मधले पन्नास श्लोक अभक्तांचा क्षय, म्लेंछसंहार, सर्व पापी बुडाले आणि हिंदुस्थान बळावले असं सांगणारे आहेत. यात समर्थांचे अत्यंत वीररसपूर्ण सहजोद्गार आहेत. मग ही कविता करुणेची की वीररसाची? वैराग्याच्या आवरणात बांधून पण अत्यंत सावधानता बाळगून सांगितलेलं हे शक्तिस्तोत्र आहे. वरवर भक्तिपर वाटावं, पण अंतरंगात ह्यगुप्त ते गुप्त जाणावे, आनंदवनभुवनीह्ण असं म्हणत उघड्या डोळ्यांनी पाहिलेली संकटं वर्णन करावीत, त्यावर सतर्कतेचे उपाय सांगावेत आणि रामवरदायिनीमातेने पूर्वी पापी नष्ट केले होते तो काळ स्मरणात ठेवून भविष्यात रामराज्याचं स्वप्न पाहावं असं या कवितेचं विलक्षण अंतःसूत्र आहे. रामाने धर्मसंस्थापना केली त्या इतिहासाचं स्मरण यात आहे. वर्तमानात चेतवलेला वन्ही आहे आणि ह्यमोडिली मांडली क्षेत्रे...ह्ण म्हणजे, आमच्या धार्मिक अस्मितेवरचे घाले परतवले जातील, भविष्यात धर्मक्षेत्रं पुन्हा मुक्त होतील, रामराज्य पुन्हा अवतरेल असा आत्मविश्वास यात आहे.

तिन्ही काळांना सांधणारी ही एक अद्भुत कविता आहे. वैराग्याच्या कुपीत दडवलेला वन्ही यात आहे. संपूर्ण काव्यच मननीय! पण नुसती क्रियापदं पाहिली तरी समर्थांच्या वाणीचं तेज लक्षात येतं. लाटिली, कुटिली, दापिली, कापिली, घर्डिली, चीर्डिली, रडवली, बडवली, खौळली... शक्य तितक्या साऱ्या मार्गांनी स्वराज्यावर चालून आलेल्या विघ्नांचा समाचार घेतला जाईल, हे सांगताना तलवारीप्रमाणे समर्थांचे शब्द पराक्रमाचे कल्लोळ करतात. त्यातून जे शब्द निपजतात ते आनंदवनभुवनी असतात!

स्वस्ताई येणार?

सणांत आनंद असतोच. पण, सणाआधीच सणाचा आनंद देण्याची किमया केंद्र सरकारच्या जीएसटी संदभार्तील सुधारणांनी केली आहे. बाजारात त्यामुळे सध्या ह्यफील गुडह्ण वातावरण आहे. ह्यफील गुडह्ण म्हणण्याचं कारण एवढंच, की या सुधारणा २२ सप्टेंबरपासून अमलात येणार आहेत. सुधारणा प्रत्यक्षात अमलात यायला आणखी १५ दिवसांचा अवधी असला, तरी त्याची सविस्तर घोषणा आधीच झाली असल्यामुळे उत्पादक, विक्रेते आणि ग्राहकांनाही या सुधारणा गृहीत धरून तयारी करायला पुरेसा वेळ मिळणार आहे. भारतीय संस्कृतीत सण वर्षभर असले, तरी 'दिवाळी हा सर्व सणांचा राजा' असं म्हटलं जातं. दिवाळीनिमित्ताने बाजारात होणारी उलाढाल, खेळणारा पैसा हा वर्षातल्या अन्य कुठल्याही काळापेक्षा कितीतरी अधिक असतो. ग्राहकांची मागणी लक्षात घेऊन त्यासाठी नवरात्रीपासूनच बाजार फुललेला असतो. मालाचा भरपूर पुरवठा असतो. जीएसटीतील सुधारणांमुळे जीवनावश्यक घरगुती उपयोगाच्या किंवा वाहनांसारख्या सणासुदीला खरेदी होणाऱ्या वस्तूंच्या किमती कमी होणार असल्याने त्याची मागणी यावेळी कितीतरी वाढेल, असा अंदाज आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी पुरवठा; म्हणजे उत्पादन वाढेल आणि त्या उत्पादनासाठी रोजगाराची मागणी वाढणं अपरिहार्य आहे. त्यामुळे, केवळ किमतीतील घटच नाही, रोजगाराच्या मागणीत वाढ झाल्यामुळेही अर्थचक्राला चांगली गती येईल. त्यामुळे, यावर्षी आनंदी आनंद कांकणभर जास्तच असेल, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. करप्रणालीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी देशाला जीएसटी सारखी करप्रणाली आवश्यकच होती. त्यामुळे जुलै २०१७ मध्ये जेव्हा ती लागू झाली, तेव्हा तिचं बहुशः स्वागतच झालं. त्यातल्या तपशिलाबाबत मात्र अनेक तक्रारी होत्या. करपात्र बाबींचं वर्गीकरण करताना केलेल्या पाच श्रेणी हे टीकेमागचं पहिलं कारण होतं. दुसरी तक्रार होती, ती वस्तूंच्या वर्गीकरणाबाबत. चपाती आणि पराठा यांना वेगवेगळ्या श्रेणीतून वेगवेगळे कर लावण्यात आले होते. तयार मालावरचा कर अनेक बाबतीत त्याला लागणाऱ्या कच्च्या मालापेक्षा कमी होता! महिलांनी मासिक पाळीच्या काळात वापरायच्या पॅडचा प्रसार होणं, त्याचा वापर तळातल्या आर्थिक स्तरातही होणं महिलांच्या आरोग्याच्यादृष्टीने आवश्यक असल्याने त्यावर कमीत कमी कर असणं योग्यच होतं. पण, या पॅडसाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर पॅडपेक्षा जास्त कर लावल्याने हेतू कसा साध्य होणार होता? हा प्रश्न होता. कपड्यांच्या बाबतीतही तसंच. सुती धाग्यावर १८ टक्के, कृत्रिम धाग्यावर १२ टक्के, तर तयार कपड्यांवर ५ टक्के कर होता. असं अनेक बाबतीत होतं. खाण्याचे पदार्थ, आयुर्वेदिक औषधं सुटी विकली, तर कर कमी; पण तीच पॅकबंद करून विकली, तर कर जास्त! अशा अनेक अर्थशून्य तरतुदी जुन्या पद्धतीत होत्या. संबंधित उत्पादक आणि विक्रेते त्या विरोधात सतत तक्रारी करत होते. पण, त्याची दखल घेतली गेली नाही. जीएसटीच्या धोरणात आणि आकार पद्धतीत आमूलाग्र सुधारणा करताना त्याचा विचार झाला याबद्दल म्हणूनच आता समाधान व्यक्त होतं आहे. कर भरण्याची प्रक्रिया आणि परताव्याची मागणी यातही सुरुवातीला खूपच क्लिष्टता होती. परताव्याच्या मागण्या कितीतरी महिने तशाच पडून राहत होत्या. उलट, करभरणा करण्यास काही तासांचा विलंब झाला, तरी कर विभागाच्या नोटिसा येऊन धडकत होत्या. देशातला उत्पादक किंवा व्यापारी जमाखर्च किंवा ताळेबंदाचा तज्ज्ञ नाही. त्याची सगळी शक्ती व्यापाराचं व्यवस्थापन आणि वृद्धीसाठी लागलेली असते. त्यामुळे, कर भरण्याची तांत्रिकता, त्यासाठी आवश्यक संगणकीय ज्ञानाची गरज याने तो पुरता त्रस्त झाला होता.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, ०९ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५

शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्यावर ६० कोटी रुपयांच्या फसवणुकीचा आरोप, मुंबई पोलिसांनी धाडली लूकआउट नोटीस



मुंबई। मुंबई पोलिसांनी शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्याविरुद्ध ६० कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या प्रकरणात लूकआउट नोटीस जारी केली आहे. त्यांच्यावर उद्योगपती दीपक कोठारी यांच्याकडून गुंतवणुकीच्या नावाखाली पैसे घेतल्याचा आणि ते वैयक्तिक वापरासाठी वापरल्याचा आरोप आहे. हा खटला त्यांच्या कंपनी बेस्ट डील टीव्हीशी संबंधित आहे. पोलिसांनी फसवणुकीच्या आरोपाखाली बीएनएसच्या कलम ४०३, ४०६ आणि ३४ अंतर्गत एफआयआर दाखल केला आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने त्यांच्या वारंवार होणाऱ्या आंतरराष्ट्रीय दौऱ्यांमुळे या जोडप्याविरुद्ध लूकआउट नोटीस जारी केली आहे. १४ ऑगस्ट रोजी शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्याविरुद्ध जुहू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कर्ज आणि गुंतवणुकीच्या नावाखाली मुंबईतील व्यावसायिक दीपक कोठारी याची सुमारे ६० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. दीपक कोठारी हे लोटस कॅपिटल फायनान्शियल सर्व्हिसेसचे संचालक आहेत, त्यांनी सांगितले की राजेश आर्य यांनी त्यांची शिल्पा आणि राज यांच्याशी ओळख करून दिली होती. त्यावेळी शिल्पा आणि राज कुंद्रा यांचा बेस्ट डील टीव्हीमध्ये ८७.६% हिस्सा होता.

दीपक कोठारी यांच्या मते, सुरुवातीला शिल्पा आणि राज कुंद्रा यांनी त्यांच्याकडे १२% व्याजदराने ७५ कोटी रुपयांचे कर्ज मागितले होते, परंतु नंतर त्यांनी कराचा बोजा कमी करण्यासाठी गुंतवणूक असल्याचे सांगून पैसे देण्यास राजी केले आणि दरमहा परतावा आणि मुद्दल दोन्ही परत मिळतील असे आश्वासन दिले. दीपक कोठारी यांनी दावा केला की त्यांनी एप्रिल २०१५ मध्ये शेअर सबस्क्रिप्शन करारांतर्गत ३१.९५ कोटी रुपये आणि सप्टेंबर २०१५ मध्ये पूरक कराराद्वारे २८.५३ कोटी रुपये हस्तांतरित केले. ही संपूर्ण रक्कम कंपनीच्या एचडीएफसी बँक खात्यात जमा करण्यात आली. मात्र, शिल्पा शेट्टी यांनी सप्टेंबर २०१६ मध्ये कंपनीच्या संचालक पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर, दुसऱ्या करारात अनियमितता आढळल्याने २०१७ मध्ये बेस्ट डील टीव्हीविरुद्ध दिवाळखोरीची कारवाई सुरू झाली. दीपक कोठारी यांचा आरोप आहे की त्यांनी राजेश आर्य यांच्यामार्फत अनेकवेळा त्यांचे पैसे परत मिळवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना यश आले नाही. त्यानंतर त्यांनी औपचारिक तक्रार दाखल केली.

मोतीलालनगरमधील रहिवाशांना सेवाशुल्काची पुन्हा वाढीव देयके



मुंबई। गोरेगाव पश्चिम येथील मोतीलालनगरमधील रहिवाशांना सेवाशुल्काच्या थकबाकीची देयके महिन्याभरापासून पाठविली जात आहेत. आता सप्टेंबरमध्ये थकबाकीत आणखी वाढ करून नवीन देयके पाठविण्यात आली आहेत. निवासी रहिवाशांना ७० हजार रुपयांची, तर अनिवासी रहिवाशांना दोन लाख ११ हजार रुपयांची थकबाकी देयकात नमूद करण्यात आली आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता म्हाडाच्या मुंबई मंडळ भरमसाठ सेवाशुल्क, थकबाकी कशी आकारत आहे, असा मुद्दा उपस्थित करीत आता रहिवाशांनी थेट म्हाडा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई - मेलद्वारे तक्रार केली आहे. या तक्रारीची मुख्यमंत्री कार्यालयाने दखल घेतली असून गृहनिर्माण विभागाला आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. म्हाडा वसाहतीतील रहिवाशांना पाणी पुरवठ्यासह इतर सोयींसाठी मुंबई मंडळाकडून सेवाशुल्क आकारले जाते. त्यानुसार मोतीलालनगरमधील रहिवाशांना महिन्याला २८८ रुपये सेवाशुल्क आकारले जाते. मात्र ऑगस्टमध्ये या रहिवाशांना थेट १६०० रुपये सेवाशुल्क आकारून २०२१ ते २०२३ पासूनची थकबाकी सेवाशुल्क देयकात समाविष्ट करण्यात आली. ३५ हजार रुपयांची थकबाकी पाहून रहिवाशी हवालदिल झाले. मोतीलालनगर विकास समितीने याबाबत मुंबई मंडळाकडे तक्रार केली. मात्र सेवाशुल्क का वाढले, केव्हा वाढले, कसे वाढले याचे कोणतेही योग्य उत्तर समितीला मंडळाकडून मिळालेले नाही.

प्रवाशांनी लावला रेल्वेला चुना, त्यामुळे आता स्थानकात क्यूआर तिकीट बंद; प्रशासनाचा निर्णय



मुंबई। मध्य रेल्वेच्या लोकल स्थानकावरील स्टॅटिक क्यूआर कोडद्वारे पेपरलेस मोबाइल तिकीट बुकिंग गुरुवारपासून बंद करण्यात आली. रेल्वेच्या यूटीएस ॲपच्या माध्यमातून स्थानकात असलेले क्यूआर कोड स्कॅन करून तिकीट काढण्याच्या सुविधेचा प्रवाशांकडून गैरवापर सुरू होता. त्यामुळे ही सुविधा बंद करण्यासाठी मध्य रेल्वेने बोडार्ला जुलै महिन्यात पत्र पाठवले होते.

मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या जिओफेन्सिंग क्षेत्रात मुंबई लोकलचे तिकीट काढण्यासाठी रेल्वेने अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यापैकी एक म्हणजे यूटीएस ॲप तिकीट काढताना प्रवाशांच्या वेळेची बचत व्हावी, त्यांचा प्रवास सुलभ व्हावा, यासाठी २०१६ मध्ये यूटीएस मोबाइल ॲप्लिकेशन सुरू केले. २०२४ या वर्षात मध्य रेल्वेवर दररोज सुमारे ६ लाख १० हजार प्रवाशांनी 'यूटीएस'चा वापर केला.

या ॲपद्वारे स्टेशनवर क्यूआर कोड स्कॅन करून तिकीट काढता येते. परंतु, तिकीट नसलेले प्रवासी धावत्या ट्रेनमध्ये कोड स्कॅन करून तिकीट काढत असल्याने बंदी घातली आहे. मध्य रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाचा योग्य प्रकारे तिकीट काढून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना फटका बसला आहे.

कोड वेबसाइटवर उपलब्ध

रेल्वेचे कोड इंटरनेटवरील अनेक वेबसाइटवर सहज उपलब्ध आहेत. त्यामुळे तिकीट तपासनीस (टीसी) लोकलमध्ये येताच अनेक विनातिकीट प्रवास करणारे प्रवासी तो कोड स्कॅन करून तिकीट काढतात. तिकीट तपासनिसांकडून अशा वारंवार तक्रारी येत असल्याने ही सुविधा बंद केल्याचे अधिकारी म्हणाले. रेल्वे स्थानकातील क्यूआर कोड स्थिर आहेत. परिणामी, ते सहज गैरवापर करणाऱ्यांना उपलब्ध होऊ शकतात. ही बाब लक्षात घेता सतत बदलणारे डिजिटल क्यूआर कोड उपलब्ध करणे गरजेचे आहे. या कोडमुळे गैरवापर करून शासनाची फसवणूक करणाऱ्यांना आळा बसेल. त्यामुळे डायनॅमिक अर्थात सतत बदलणारे क्यूआर कोड रेल्वे स्थानकात उपलब्ध केल्यास अशा घटना सहज रोखता येणे शक्य होणार असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

रेल्वेकडून आता तिकीट तपासणीसांची होणार बायोमेट्रिक हजेरी

नागपूर। मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने आधुनिकीकरण आणि पारदर्शकतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत तिकीट तपासणी करणाऱ्यांसाठी (टीटीई) बायोमेट्रिक साइन ऑन/ऑफ प्रणाली लागू केली आहे. ही योजना रेल्वे बोर्डाच्या नव्या धोरणांतर्गत सुरू करण्यात आली असून, ड्यूटी प्रमाणीकरण प्रक्रिया सुलभ करणे आणि तिकीट तपासणी कार्यांची जबाबदारी सुनिश्चित करणे हा यामागचा उद्देश असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



या व्यवस्थेत आता टीटीईची ड्यूटी सुरू करणे आणि ती पूर्ण करणे या दोन्ही प्रक्रिया बायोमेट्रिक पडताळणीद्वारेच प्रमाणित केल्या जाईल. यामुळे कर्मचारी आपल्या मूळस्थान व गंतव्य स्थानकांवर प्रत्यक्ष उपस्थित असल्याची खात्री होईल आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार आहे. ही सुविधा नागपूर विभागातील नागपूर तसेच बल्लारशाह या दोन प्रमुख डेपोमध्ये सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी नागपुरात ६ बायोमेट्रिक यंत्रणा तर बल्लारशाह डेपोमध्ये ४ यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत.

या डेपोमधील सर्व तिकीट तपासणी कर्मचारी आता ड्यूटी साइन ऑन /ऑफसाठी केवळ बायोमेट्रिक प्रणालीचाच वापर करत आहेत. नागपूर विभागातील इतर सर्व डेपोमध्ये लवकरच ही प्रणाली विस्तारित करण्याची योजना आहे. ते झाल्यानंतर विभागातील प्रत्येक टीटीईला फक्त बायोमेट्रिक प्रणालीद्वारे ड्यूटी साइन ऑन / ऑफ करणे बंधनकारक राहणार. ही योजना पारदर्शकतेस बळकटी देणार असून, तिकीट तपासणी सेवेत जबाबदारी तसेच कार्यक्षमताही वाढवण्यास कारणीभूत ठरणार असल्याचा विश्वास या संबंधाने रेल्वे अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

डिजिटल सोयी-सुविधांवर भर देशभरात प्रचंड मोठे नेटवर्क असलेल्या रेल्वेत प्रवाशांसाठीच्या अनेक सोयी-सुविधा डिजिटल करण्यावर भर दिला जात आहे. आधुनिकीकरणाची कास धरतानाच रेल्वे प्रशासनाने अलीकडे पारदर्शितेवरही भर दिला आहे. या पार्श्वभूमीवर, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने अशा प्रकारे आपल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा संबंधानेही डिजिटल उपाययोजना राब-विण्याला सुरुवात केल्याने रेल्वे संचालनावरील विश्वास आणखी दृढ होईल, असे मत स्थानिक अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

शिक्षक सेवेत असणाऱ्या शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

नागपूर। खडतर अर्थात जास्त काठीण्य पातळी असणारी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारासाठी ही बातमी महत्वाची आहे. परिश्रम, सखोल अभ्यास, नियोजन, कुशाग्र या चारसूत्रीच्या पाठबळावर ही परीक्षा पास करणाऱ्या भावी गुरुजींना पात्रता प्रमाणपत्राची मागील तब्बल सहा महिन्यापासून आतुरतेने प्रतीक्षा होती. परीक्षेचा ऑनलाईन निकाल सहा महिन्यापूर्वी जाहिर होऊनही हाती प्रमाणपत्र मिळाले नाही. एक दोन महिने नव्हे तब्बल सहा महिन्यापासून उमेदवारांची प्रतीक्षा कायम होती. त्यांचे जीव टांगणीला लागले होते. त्यानंतर टीईटी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. मात्र आता शिक्षक सेवेत असणाऱ्या शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल जाहीर केलेला आहे. काय आहे ते बघूया. सेवेत कायम राहण्यासाठी किंवा पदोन्नतीसाठी शिक्षकांनी



शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) देणे व उत्तीर्ण होणे अनिवार्य असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला. ही परीक्षा देणे बंधनकारक आहे का असा सवाल उपस्थित करत महाराष्ट्र, तामिळनाडूसह काही राज्यांनी दाखल केलेल्या याचिकांवर हा निकाल देण्यात आला. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (एनसीटीई) २०१० मध्ये इयत्ता १ ते ८ पर्यंतच्या शिक्षकांच्या नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक अर्हता ठरवली होती. त्यानंतर एनसीटीईने टीईटी परीक्षा सुरू केली. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपांकर दत्ता, न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, ज्या शिक्षकांना निवृत्त होण्यासाठी पाच वर्षे शिल्लक आहेत तेच फक्त परीक्षा न देता आपल्या सेवेचा कालावधी पूर्ण करू शकतील. पण ज्यांना निवृत्त होण्यासाठी पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी शिल्लक आहे, त्यांनी टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. ज्यांना ही गोष्ट शक्य नसेल त्यांनी राजीनामा द्यावा किंवा सेवानिवृत्तीचे फायदे घेऊन सक्तीची निवृत्ती स्वीकारावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. अल्पसंख्याक समुदायाच्या शिक्षण संस्थांतील शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा बंधनकारक करण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे का, त्यामुळे या शिक्षण संस्थांच्या हक्कांवर काही परिणाम होणार आहे का याची तपासणी करण्यासाठी हा मुद्दा विस्तारित खंडपीठाकडे सुपूर्द करण्यात आल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.

मुंबईवरून निघाले... कसाऱ्याजवळ मृत्यूने गाठले; कारचा भीषण अपघात



मुंबई। मुंबईकडून नाशिकच्या दिशेने जात असलेल्या एका कारचा भयंकर अपघात झाला. शहापूर तालुक्यातील कसाराजवळ मंगळवारी (२ सप्टेंबर) रात्री ही घटना घडली. यात दोन जण जागीच ठार झाले, तर एका व्यक्तीचा रुग्णालयात घेऊन जाताना मृत्यू झाला. कारमधील इतर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

कार मुंबईवरून निघाली होती. कारमध्ये पाच जण होते. मंगळवारी रात्री कसारातील ऑरेंज हॉटेल समोरून जात असतानाच कारचा अपघात झाला. चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि ती रस्त्याच्या बाजूला असलेल्या मोठ्या खड्ड्यात जाऊन पडली.

वेगात असलेल्या कारचा या अपघातात पाठीमागच्या बाजूने चक्काचूर झाला. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि इतर कर्मचारी अपघातस्थळी आले. तातडीने त्यांनी कार बाजूला काढली आणि त्यातील जखमींना तातडीने रुग्णालयात नेले. तीन मृतदेह शवविच्छेदनासाठी खर्डी येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले. या अपघातामुळे वाहने थांबवल्याने वाहतूक कोंडीही झाली होती. मृत आणि जखमींची नावे अद्याप कळू शकलेली नाहीत.

विहिरीला गरम पाणी; थंड पाणी मिसळल्याशिवाय हातही घालता येईना

कमलापूर। अहेरी तालुक्यातील कमलापूरपासून दोन किलोमीटरवरील ताटीगुडम गावात ४ सप्टेंबरला आश्चर्यजनक प्रकार समोर आला आहे. गावातील एका विहिरीला चक्क गरम पाणी येत असून, त्यामुळे परिसरात कुतूहल निर्माण झाले आहे. तालुका प्रशासन याबाबत अनभिज्ञ असून, भूगर्भातील उष्ण खडकाचा हा परिणाम असू शकतो, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. हे पाणी एवढे गरम आहे की, त्यात थंड पाणी मिसळल्याशिवाय हातही घालता येत नाही, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. त्यामुळे ग्रामस्थांत मोठे कुतूहल निर्माण झाले आहे. वैज्ञानिक दृष्टीने याचा योग्य तो निष्कर्ष काढणे गरजेचे आहे. सत्यांना मलय्या कटकू (रा. ताटीगुडम) हे शेती करतात. घराजवळच त्यांनी विहीर खोदली आहे. यंदा मुसळधार पाऊस झाल्याने त्यांच्या विहिरीलाही पाणी आले. ४ सप्टेंबरला त्यांच्या विहिरीतून गरम पाणी येत असल्याचे निदर्शनास आले. ही वार्ता संपूर्ण परिसरात पोहोचली. यासंदर्भात अहेरीचे तहसीलदार बालाजी सोमवंशी यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी मला या घटनेची माहिती नाही, असे सांगितले. यासंदर्भात माहिती घेऊन सांगतो, असे ते म्हणाले.


म्हाडातर्फे पुणे आणि पिंपरी- चिंचवड शहरांमध्ये साडेचार हजार घरांची सोडत

पिंपरी। महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण पुणे (म्हाडा) वतीने येत्या पंधरा दिवसांमध्ये पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांमध्ये साडेचार हजार घरांची सोडत काढण्यात येणार आहे. त्याचबरोबर चाकण आणि नेरे परिसरामध्ये नवीन प्रकल्प उभारण्याची उभारण्याचे नियोजन आहे, अशी माहिती म्हाडाचे पुणे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना दिली. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या आरतीसाठी पिंपरी- चिंचवड आढळराव पाटील आले असताना पत्रकारांशी संवाद साधला. आढळराव पाटील म्हणाले, म्हाडाच्या पुणे महामंडळाअंतर्गत पुणे, सांगली, सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्याचा



समावेश होतो. महामंडळाच्या माध्यमातून विविध भागांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना घरकुल उपलब्ध करून देण्याचे काम केले जात आहे. पुणे जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी प्रकल्पांचे नियोजन सुरू आहे. गेल्या दीड वर्षांमध्ये आत्तापर्यंत घरकुलांसाठी तीन सोडती काढल्या आहेत. येत्या पंधरा दिवसांमध्ये सुमारे साडेचार हजार घरांची सोडत निघणार आहे.' आढळराव पाटील म्हणाले, म्हाडाच्या वतीने स्वतंत्र प्रकल्प उभारण्याबरोबरच खाजगी विकसकांच्या माध्यमातूनही प्रकल्प उभारले जात आहेत. त्यात म्हाडाची भूमिका महत्त्वाची आहे. संत तुकारामनगर येथील सुमारे एक हजार गाळ्यांचा पुनर्विकास करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया तेथील गाळेधारक एकत्र येऊन खाजगी विकासाच्या माध्यमातून प्रकल्प राबवू शकतात. त्या प्रकल्पाला ना हरकत देण्याचे काम म्हाडा करीत आहे.' शहराचा विकास वेगाने होत आहे. त्यामुळे त्या- त्या भागांमध्ये प्रकल्प उभारण्याकडे प्राधान्य दिले जात आहे. म्हाडाच्या वतीने चाकण आणि पिंपरी-चिंचवड शहरालगतच्या भागांमध्ये असणाऱ्या चाकण आणि नेरे परिसरामध्ये असणाऱ्या म्हाडाच्या नवीन प्रकल्प राबविण्याचे नियोजन सुरू आहे, असेही आढळराव पाटील यांनी सांगितले.

'आयटी'त नोकरीच्या बहाण्याने फसवणूक; कंपनीच्या संचालकांवर आणखी एक गुन्हा



पिंपरी। फ्लायनाट सास प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या संचालकांनी आयटी अभियंत्यांची नोकरी देण्याच्या बहाण्याने फसवणूक केल्याचे प्रकरण उघडकीस आले. त्यानंतर याबाबत २३ ऑगस्ट रोजी हिंजवडी पोलिस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल झाला. त्यानंतर आता सोमवारी (दि. १ सप्टेंबर) दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका संचालकाला अटक केली आहे. राहुल जगन्नाथ शिंदे (२४, रा. पिंपरी ता. भोकरदन, जि. जालना) यांच्या फियार्दीवरून दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फ्लायनाट सास कंपनीचे संचालक उपेश रणजित पाटील (३७, रा. रावेत), रोहन अंबुलकर (रा. नागपूर) आणि एका महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयितांनी जॉब प्लेसमेंटच्या नावाखाली फियार्दी आणि त्यांच्या इतर मित्रांकडून प्रत्येकी दीड ते अडीच लाख रुपये घेतले.

त्यानंतर त्यांना काही दिवस ऑनलाइन प्रशिक्षण दिले आणि त्यांच्याकडून काम करून घेतले. कोणतेही प्रकल्प न देता संशयितांनी वेगवेगळी कारणे देऊन त्यांना कामावरून काढून टाकले. अशा प्रकारे संशयितानी आयटी फ्रेशर्सचा विश्वासघात केला.

घरी कुणी नसताना भेटायला गेला अन् होणाऱ्या पत्नीचीच केली हत्या; पालघरमधील घटना



अकोला। एका १७ वर्षीय तरुणीचे तिच्या होणाऱ्या नवऱ्यानेच हत्या केल्याची घटना समोर आली. पालघर जिल्ह्यातील जोहार तालुक्यात असलेल्या बिवलधर गावात ही घटना घडली आहे. एका पोलीस अधिकाऱ्यांने वृत्तसंस्थेला या घटनेबद्दलची माहिती दिली. २२ वर्षीय तरुणाने १७ वर्षीय तरुणीची हत्या केली. मंगळवारी (२ सप्टेंबर) ही घटना घडली. जोहारचे पोलीस उपअधीक्षक समीर एस. माहेर यांनी सांगितले की, आरोपीचे मुलीवर प्रेम होते. त्यांचं लग्नही ठरलं होतं.

२२ वर्षीय आरोपी तरुणीला भेटायला यायचा. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मंगळवारी दुपारी तरुणीच्या घरी आला होता. त्यावेळी तिचे आईवडील शेतात गेलेले होते. ते दोघेच घरात होते. त्याचवेळी दोघांमध्ये वाद झाला आणि रागात त्याने तरुणीचा गळा दाबला. त्यात तिचा मृत्यू झाला. दोघांमध्ये वाद का झाला, हे अद्याप कळू शकलेलं नाही. आरोपीने तरुणी हत्या केली आणि तो घटनास्थळावरून फरार झाला. थोड्या वेळाने काही शेजाऱ्यांनी घरात बघितलं असता, तरुणी मृतावस्थेत मिळाली. त्यानंतर याची पोलिसांना माहिती देण्यात आली.

पोलिसांनी तरुणीचा मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलीस उपअधीक्षक म्हणाले की, आरोपीचा शोध सुरू होता. बुधवारी त्याला अटक करण्यात यश आले. त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com